महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक दुरुस्ती-०३१८/प्र.क्र.१४३/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १० मे २०१८.

विषय :- राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे, येथे विद्युतविषयक दुरुस्तीचे काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ स्ट्रीट-लाईट-बसविणे-गट-क्र.१-पुणे/ २०९/ २०१५, दिनांक २३.०३.२०१८.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे, येथे विद्युतविषयक दुरुस्तीचे पुढील काम करण्यासाठी रु.१४,०३,८५२/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे:-

कामाचे नाव	खर्चाचे अंदाज
“Providing flood light at S.R.P.F., Group I, at Wanawadi, Pune.”	रु.१४,०३,८५२/-

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उप अभियंता, विद्युत (सार्वजनिक बांधकाम) उपविभाग क्र.१, पुणे, यांनी सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, विद्युत (सार्वजनिक बांधकाम) विभाग, पुणे, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.१६,७३,८२३/-** असे सुधारित केले आहेत आणि, विवक्षित अटींवर, प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे, येथे विद्युतविषयक दुरुस्तीचे परिच्छेद १ मधील तक्त्यात नमूद केलेले काम करण्यासाठी **रु.१६,७३,८२३/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-
1) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे, यांनी खर्चाचे अंदाज सांक्षाकित करावे;
2) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरु करु नये या अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) (*दत्तमत*) (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७१/इमा-२, दिनांक ०२.०४.२०१८, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०५१०१८१५१२९१२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d44 3b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.05.10 18:14:22 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे.
४) समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१, पुणे.

प्रत :-

१) कार्यकारी अभियंता, विद्युत (सार्वजनिक बांधकाम) विभाग, पुणे *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारित केलेल्या "Abstract Sheet" च्या प्रतीसह).*
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/विनियम), मंत्रालय, मुंबई.
५) निवड फाईल (पोल-७).